# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सिरसाप्पा इरसंगाप्पा अंकलकोट,<br>मु.पो. करजगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सिरसाप्पा इरसंगाप्पा अंकलकोट, मु.पो. करजगी, ता. जत, जि. सांगली यांनी महावितरण (सामनेवाला) संवसु विभाग, कवठे महांकाळ यांचेकडे गट क्र. २०९ येथील शेतीपंप विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. ३०.११.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी फी रु. ५०/–पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदाराचा अर्ज प्राप्त झालेपासून १ महिन्याचे आंत वि.प.ने चलन देणे गरजेचे आहे परंतु तशी कृती वि.प.ने केली नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ५७६ दि. १.१२.२००९ रोजी दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १०८४२ दि. ४.१२.२००९ नुसार कृती मानके साध्य करण्यात वितरण कंपनीला अपयश आल्यास ग्राहकास भरपाई देणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. प्रस्तुतची तक्रार दिनांक ११.२.२०१० रोजी दाखल केली आहे. अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंत झालेल्या विलंबाबाबत कृती मानकानुसार भरपाई मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वि.प.ने नोटीस देवूनही दि. ३.३.२०१० पर्यंत आपला लेखी अहवाल दिला नाही. दि. २३.३.२०१० ला तक्रारीची सुनावणी ठेवली असता, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मार्च अखेर असलेने विशेष बील वसुली मोहिमेमुळे मुदत वाढवून मागितली व त्यांचे विनंतीवरुन सदर तक्रारीची सुनावणी दि. ७.४.२०१० रोजी ठेवण्यात आली. वि.प.ने आपल्या ७.४.२०१० च्या लेखी अहवालात, तक्रारदाराचा अर्ज १.१२.२०१० रोजी प्राप्त झाला व दि. ५.३.२०१० ला चलन देण्यात आले असे म्हटले आहे. मंचासमोर तक्रारीची सुनावणी दि. ७.४.२०१० रोजी घेतली असता प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. अे.के.कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग हजर. श्री. मैंलापुरे यांनी विलंबाबाबत स्पष्टीकरणा पृष्ट्यर्थ कागदपत्रे सादर करण्यास मुदत मागितली, ती त्यांना ३.५.२०१० अखेर देण्यात आली. तथापि त्यांनी कुठल्याही प्रकारची कागदपत्रें हजर केली नाहीत. तक्रारदारासही कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगितल्यामुळे विलंब झाला, परंतु ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार कागदपत्रांची पूर्तता ग्राहकाने केली नसली तर चलन देणे जरुरी आहे असे सांगितले.

उभयबाजूंचे कथनानुसार चलन देण्याबाबत विलंब झाला आहे हे स्पष्ट होते. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी तक्रारदारास कागदपत्रांच्या पूर्ततेविषयी कळविल्याचे व त्यामुळे विलंब झाल्याचे सांगितले, परंतु त्याबाबत लेखी स्पष्टीकरण केले नाही. असे असले तरी, कृती मानकाप्रमाणे कागदपत्रें पूर्ण नसली तरी चलन देणे जरुरी आहे हे तक्रारदार प्रतिनिधीचे म्हणणे मान्य करावे लागते. त्यामुळे श्री. मैंलापुरे यांनी विलंबाबाबत दिलेले तोंडी स्पष्टीकरण मान्य करता येणार नाही. मुदत देवूनही दि. ३.५.२०१० पर्यंत वि.प.ने कागदपत्रें दिली नाहीत, त्यामुळे १.१.२०१० ते ५.३.२०१० या काळातील ९ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ९००/– भरपाई वि.प. तक्रारदारास देणेस जबाबदार आहे.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वितरण कंपनीने तक्रारदार यांस दिनांक १.१.२०१० ते ५.३.२०१० या विलंबाच्या ९ आठवड्याच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ९००/– भरपाई द्यावी.
२) सदर रकमेचे दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ३.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :